संदर्भ :

१. नागनाथ कोत्तापल्ले – रक्त आणि पाऊस कर्फ्यु आसणि इतर कथा
२. भास्कर चंदनशिव – अंगारमाती
३. बाबाराव मुसळे – मोहरलेले चंद्र
४. ग.पी. मनुरकर – लेण्यातील चंद्रकोर
५. प्रतिमा इंगोल – हजारी बेलपान, अक्षदीचे दाणे
६. बाबा भांड – सावली
७. सदानंद देशमुख – उठावण, लचांड
८. सदानंद देशमुख – तहान, बारोमास
९. विश्वास पाटील – झाडाझडती
१०. विठ्ठल वाघ – काया मातीत मातीत
११. ना.धों. महानोर – अजिंठा
१२. केशव देशमुख – पाढा





# ग्रामीण पर्यटनं आणि त्याचा विकास

डॉ. शिवाजी सोमला पवार
संशोधन–मार्गदर्शक, इतिहास विभाग
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड

• ग्रामीण पर्यटन आणि त्याचा विकास

मानवाला प्रवास करणे म्हणजे पर्यटन करण्याची आवड प्राचीन काळापासूनच निर्माण झालेली आहे.संद्य:स्थितीला वाहतुकीच्या क्षेत्रात मोठी प्रगती उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण भागापर्यंत पर्यटन सुविधा,सुलभ सोईसकर झाले आहेत.या सुविधामुळे आज जगात पर्यटनाला खूप महत्व प्राप्त झाले आहे.पर्यटनाचे महत्व,भौगोलिक,धार्मिक,ऐतिहासिक मौजमजा करणे, आनंद मिळविणे, अभ्यास व संशोधन इत्यादी कार्यासाठी पर्यटनाचे स्थान आहे.पर्यटनामुळे ग्रामीण भागातील लोकांना उपजिवीकेचे व उद्योग व्यवसाय करण्याचे फार मोठे साधन आहे.या पर्यटनामुळे सरकारला बराच फायदा मिळू शकतो.या उद्योगामुळे अनेक लोकांना रोजगार उपलब्ध होतो तसेच या उद्योगावर आधारित अनेक पुरक व्यवसायही चालतात उदा:उपाहारगृहे, पुस्तके, लॉज, हॉटेल, छायाचित्रकार, मार्गदर्शक,
जाहिरात,बाजारपेठ,प्रवास वाहतूक, रस्ताविकास, दळणवळण साधनात मोठी वाढ, शिक्षण संस्था, संरक्षणविभाग, आरोग्यसुविधा, पर्यावरणाची जोपासना या विविध बाबीत मोठी भांडवली सुधारणा घडवून येते.

ग्रामीन विकास हा प्रवास आणि पर्यटन यामुळे अग्रेसर व्यवसाय जगातील असला तरी तो सेवा उद्योग म्हणून गनला जातो.या पर्यटन उद्योगव्यवसायासाठी कोणत्याही प्रकारचे भांडवल,यंत्रसामग्री आणि लागणारा कच्चा माल यांची आवश्यकता नाही.पर्यटन उद्योगातून जरी उत्पादन मिळत असलेतरी पर्यटनास उद्योगाचा दर्जा देता येत नाही.या उद्योगात वस्तूचे उत्पादन होत नसल्यामुळे हा उद्योग सेवा उद्योग म्हणून गणला जातो, Toursm या शब्दाचा अर्थ Journey म्हणजे प्रवास असा होतो.हा प्रवास जागेचा
शोध घेणे,शिक्षण घेणे, अभ्यास करणे, व्यवसाय आणि आनंदप्राप्तीसाठी होत असतो, पर्यटकशुद्धा वेगवेगळया भागात जावून तेथील सभ्यता, संस्कृती, आर्थिक,सामाजिक, शैक्षणिक,राजकीय,ऐतिहासिके.स्थळे, धार्मिक स्थळे, भौगोलिक स्थान,जलस्थान,पर्यावरण सणउत्सव,राहणीमान या विविध बाबी या पर्यटनातून पाहावयास मिळतात.

• पर्यटनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी (Historical Background of tourism)

प्राचीन काळापासून चालत आलेली प्रवास ही प्रक्रिया आहे.सुरूवातीपासूनच मानवाला प्रवासाची आवड आणि आकर्षण आहे.प्रवास करणारे लोक हे खलाशी,यात्रेकरू,अभ्यासक,

संशोधक, शास्त्रज्ञ, व्यापारी,करमणूक व मनोरंजन, संस्कृती, भौगोलिक स्थान, कलचर, स्थापत्यकला, मुर्तिकला, नैसर्गिक ठेवण,

लोकाचे राहणीमान या विविध बाबीसाठी प्रवासाचे प्रमाण वरचेवर वाढत गेल्यामुळे शहरी किंवा ग्रामीण पर्यटनात विकासाची भर पडूलागली. पर्यटनामुळे व व्यापारांच्या निमित्ताने प्रवास केला जात असे.या बाबीमुळे दुरवरच्या लोकांशी तेथील सांस्कृतिक संबंध निर्माण झाले. यामुळे मानवी संस्कृतीचा विकास झाला.त्यामुळे जगातील

विविध प्रदेशाच्या शोधासाठी आणि जगातील प्रदेशांच्या पाहणीसाठी हेतुपर्वक प्रवास करण्यात येऊ लागला.इ.स.पूर्व चार हजारमध्ये बाबिलोनियातील सुमेरियनाच्या गुप्त खजिन्याचा शोध लागला तसेच व्यापारात भरपूर प्रगती झाली.त्यामुळे प्रवासाचे प्रमाण वाढत गेले.शुल्गी या बाबिलोनियाच्या राजाने प्रवासाच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर प्रवासी व वाटसरू लोकांसाठी विश्रांतीगृहे बांधली होती.प्राचीन काळातील ग्रीक प्रवास वर्णनांची नोंद होमर ओडीसीमध्ये आढळते.फोअेनेशियन यांना आधुनिक प्रवासी म्हणून उल्लेखिले जाते.इसवीसनाच्या अठराव्या शतकात प्रवासाचे निमित्त आणि त्यांचे स्वरूप यांच्यात बदल झाला. मनोरंजन,मौजमजा,भौगोलिक स्थान,संस्कृती, राहणीमान व आनंदप्राप्तीच्या हेतूने प्रवास करण्यात येऊ लागला.रोमन साम्राज्यात उत्तम दळणवळण पद्धती आणि सुरक्षितता असल्यामुळे रोमन लोक प्रवास करण्यात आघाडीवर असून ते मनोरंजनासाठी प्रवास करणारे जगातील प्रवासी ठरले रोमन साम्राज्यात प्रवाशांसाठी समुद्रकिनारी आरोग्यधाम बांधले होते.इ.स.१८ व्या शतकाच्या मध्यात युरोपमध्ये मनोरंजनासाठी समुद्रकिनारी भ्रमंती करणे व-समुद्रात पोहणे इत्यादी पर्यटनाचे कार्यक्रम सुरू झाले. यामधूनच आधुनिक पर्यटनाचा उदय झाला. इ.स.१८व्या शतकाच्या अखेरीस युरोपात वार्षिक सुट्टी देण्यास सुरूवात झाली. जगात ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाल्यामुळे धार्मिक दृष्टीने प्रवास प्रचलित होऊन शहरी व ग्रामीण भागात त्याचे महत्व प्राप्त झाले.बौद्ध,इस्लाम,जैन,हिंदू समाजातील व्यक्तींनी त्यांच्या धार्मिक स्थळांना भेटी देऊ लागले.इ.स.१८३० मध्ये जगात प्रथमच

इंग्लंडमध्ये लिव्हरपूल ते मँचेस्टर या दरम्यान रेल्वे धावली.त्यानंतर इ.स.१८५३ मध्ये भारतात प्रथमच ठाणे ते मुंबई या दरम्यान रेल्वे धावली.रेल्वेत भोजनव्यवस्था इ.स.१८७० मध्ये सुरू झाली.पर्यटनासाठी रेल्वेमार्ग आरामदायी असल्याने रेल्वेस महत्व आले.इ.स.१८६९ मध्ये सुएझ कालवा व १९१४ मध्ये पनामा कालवा सुरू झाल्यामुळे सागरी पर्यटनात वाढ झाली. रेल्वे व सागरी दळणवळणाप्रमाणेच मोटार वाहतूकही प्रवासाला प्रोत्साहन देणारी ठरली १९व्या शतकात औद्योगिकक्रांतीमुळे मोटार रस्त्यावर आली.इ.स.१९४५ नंतर मोटार वाहतूकीमुळे पर्यटनात वाढ झाली. आंतरराष्ट्रीय पर्यटनात हवाई वाहतूकीमुळे वाढ झाली इ.स.१९६० नंतर हवाईमार्ग, जलमार्ग, भू मार्गामुळे पर्यटनात वाढ होऊन शहरी व ग्रामीण भागाचा विकास झाला.





• ग्रामीण पर्यटन विकासाची उद्दिष्टये :– (Rural Objects of Tourism)

१) व्यक्तीच्या जीवनातील भौगोलिक स्थानातून आनंद मिळविणे.

२) स्थानिक जागेवर राहून कंटाळवाणे वाटत असल्याने पर्यटनात मौजमजा करणे.

३) पर्यटनामुळे नविन भूगांचा, भौगोलिक-स्थानाचा, ऐतिहासिक स्थानाचा, संस्कृतीचा, परंपरेचा संशोधन करणे.

४) पर्यटनातून नविन भागाचा अभ्यास करून प्रवासवर्णनात मांडणी करणे.

५) पर्यटनातून मानसाची करमणूक व मनोरंजन करणे.

६) पर्यटनातून बाहेरील भागातील मंदिरे, मुर्ती,देवदेवताचे दर्शन घेणे.

७) या प्रवासातून देशाचा इतिहास व संस्कृती समजून घेणे.

८) पर्यटनातून ऐतिहासिक कला,स्थापत्य व मुर्तिकलांची पाहणी करुन मांडणी करणे.

९) प्रवासातून तेथील भाषा व शिक्षण घेणे.

१०) नविन भूभागातील आरोग्य विषयक माहिती जाणून घेणे

११) प्रवासातून व्यापार व व्यवसायाची निर्मिती करणे.

• पर्यटनाची वैशिष्टये : (Rural Positives of Tourism)

लोकांचा विभिन्न ठिकाणी होणारा प्रवास आणि त्यांनी त्या ठिकाणी केलेल्या वास्तव्यामुळे विविध घटकांचा आविष्कार निर्माण होत असतो.पर्यटनातून भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक,आर्थिक, धार्मिक,ऐतिहासिक व राजकीय अशा संयुक्त घटकांचा आविष्कार घडून येतो.पर्यटन हा मानवाचा आर्थिक व्यवसाय असून या व्यवसायात लोक प्रवास करतात आणि ते त्यांच्या नेहमीच्या ठिकाणातून दुस–या ठिकाणी वास्तव्य करीत असल्यामुळे रोजगार मिळालेले किंवा व्यवसाय करणे पर्यटनात अपेक्षित नाही.पर्यटक हा वेगवेगळया ठिकाणी भेटी देऊन नविन माहिती उपलब्ध करतो त्यामुळे वाहतूक,निवास व्यवसाय, भोजनव्यवस्था, मार्गदर्शन आणि मनोरंजन, पर्यटनातून प्राप्त होतो.पर्यटन हा एक सेवा व्यवसाय असून यामध्ये तृतीय श्रेणीचे व्यवसायकि मोडतात, थंड हवेच्या ठिकाणी उन्हाळयात तर हिवाळयात हिमाच्छादित प्रदेशात पर्यटक पर्यटनासाठी जातात.पर्यटन व्यवसाय अत्यंत संवेदनक्षम आहे. कारण या व्यवसायावर पर्यटकांच्या आवडी निवडी आणि कल्पनांचा बराच प्रभाव दिसतो.पर्यटन ही अर्थप्राप्तीविरहित प्रक्रिया आहे.पर्यटन हे केवळ आनंदप्राप्ती आणि मौजमजेसाठी केले जाते. पर्यटनासाठी विविध देश विदेशातील पर्यटक येत असतात.ते पर्यटक पर्यटनस्थळी एकत्र भ्रमंती करतात व एकाच इमारतीत राहतात.त्यामुळे त्यांच्यात स्वाभाविक संबंध निर्माण होतात.त्याच्यात भाषा व संस्कृतीच्या बाबतीत वैचारिक देवानघेवाणमुळे त्या भागाच्या विकासात भर पडते. पर्यटक एकटाही पर्यटनास जाऊ शकतो व सामुहिकही पर्यटनास जाऊ शकतो.त्यामुळेच पर्यटन

ही व्यक्तिगत प्रवृत्ती न होता सामूहिक प्रवृत्ती आहे.पर्यटन हा आधुनिक काळातील एक उद्योग मानला जातो.कारण प्रामुख्याने विविध सेवा प्रदान करण्यामुळे पर्यटनास सेवा उद्योग मानता येते. पर्यटनामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध होतो.ही उद्योगप्रकिया अनेक लोकांशी संबंधित आहे. पर्यटनामुळे पर्यटकांसाठी वाहतूक संस्था,हॉटेल,उपहारगृह,लॉज,परिवहन मंडळ, खाजगी वाहतूक व्यवस्था,आणि त्यासाठी लागणारे कामगार वर्ग यांची आवश्यकता भासू लागली.यामधूनच सरकारी व निमसरकारी प्रवास एजन्सी उदयास येवून यातून उद्योग निर्माण झाले.हे सर्व उद्योग पर्यटनास पूरक उद्योग असून हे सर्व सेवा उद्योग आहेत.यातूनच सुशिक्षित तरूणाच्या हाताला काम मिळून त्या भागाचा आर्थिक विकास होतो.

• ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप : (Rural Nature of Tourism )

आधुनिक जगातील प्रत्येक देशातील ग्रामीण पर्यटन हा महत्वाचा उद्योग मानला जातो.या उद्योगासाठी यंत्रसामुग्री अथवा कच्चा माल लागत नाही.त्यामुळेच पर्यटन हा जगातील एक वाढता उद्योग ठरला आहे.

या उद्योगामध्ये प्रवास आणि वास्तव्य या दोन गोष्टी नेहमीच्या निवासापासून व कार्यापासून नेहमीच दूर असतात.मानव हा जमिनीवरून,पाण्यावरून अर्थात सागरातून व हवेतून प्रवास करीत असतो.वाहतूक प्रतिनिधी व वाहतूकदारांच्या दृष्टिकोनातून पर्यटन हा निर्यात उद्योग बनला आहे.म्हणूनच पर्यटन हा तांत्रिक विकासाला साहयभूत ठरणारा उद्योग आहे.मानवी जीवनामध्ये करमणूक, आनंद,मौजमजा आणि मनोरंजन या घटकांना विशेष महत्व आहे. पर्यटनासाठी ज्या ठिकाणी आपण जातो त्या ठिकाणचा निसर्गसौंदर्य, आल्हाददायक हवामान, बर्फाळ प्रदेश, तलाव,सरोबर,

धबधब्या, जंगली प्राणी,जलचरप्राणी,उभयचरप्राणी हे मानवाचे करमणूक व मनोरंजन हाच एक हेतू असतो.पर्यटन घटनेत पर्यटकांच्या अर्थात लोकांच्या हालचाली व चैतन्य या भागाचा समावेश होत असतो.पर्यटनाचा कोणत्याही व्यवसायशी किंवा उपजीविकेच्या उद्योगधंद्याशी संबंध नसतो.धार्मिक तीर्थस्थळे पाहण्यासाठी विद्यार्थ्यापासून ते वृद्धापर्यंत कोणीही पर्यटक जाऊ शकतो.पर्यटन केल्यानंतर पर्यटकाला धार्मिक व सांस्कृतिक माहिती मिळते.भारतात ग्रामीण व शहरी भागात अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत.त्यात मंदिरे, बारव,विहिरी,किल्ले,राजवाडा, भव्यदरवाजे,तंटबंदी, ताजमहाल, बीबीका मकबरा,गोलघुमट,कुतुबमिनार,उंच मनोरे, शिल्प, लेण्या,गुव्हा,स्तूप,

नाणीघाट, स्मारके, कबर या सारखी विविध पर्यटन साधने पाहावयास मिळतात.हे पाहण्यासाठी देशांतर्गत पर्यटक व बाहय देशातून येणारे पर्यटक यांच्या संख्येमध्ये वरचेवर भर पडत आहे. पर्यटनास संबंध वाहतूक व दळणवळण क्षेत्राशी आहे.त्यामुळे पर्यटन हे वाहतुकीच्या साधनावर अवलंबून आहे.दळणवळण क्षेत्रात प्रगती होत गेल्यामुळे पर्यटनाला





चालना मिळाली.त्यामुळे जगाच्या कानाकोप–यात विविध ठिकाणी पर्यटनासाठी जाऊ लागला त्यामुळे त्या भागाचा विकास होऊ लागला.

• ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती : (Rural Scope of Tourism)

पर्यटनामध्ये अनेक भौगोलिक व ऐतिहासिक घटकांचा समावेश होतो.त्यामुळे पर्यटनाचे स्वरूप व व्याप्तीसुद्धा व्यापक बनली आहे.पर्यटनाच्या व्याप्तीत पर्यटनाचे प्रकार, पर्यटन नियोजन,भौगोलिक घटकांचे महत्व, विभिन्न देशांतील पर्यटन स्थळे, पर्यटन बाजारपेठा,वाहतूक, निवासस्थान आणि केंद्रीय पर्यटन या क्षेत्राचा विकास आणि पर्यटनाचे आर्थिक व सामाजिक होणारे परिणाम इत्यादीचा समावेश होतो.आग मात्र या पर्यटनात आधुनिक पद्धतीने बदल होत आहेत.पर्यटकांचा कल हाँ स्वतःचे मनोरंजन व करमणूक करून घेण्याकडे असल्यामुळेच पर्यटक पर्यटनासाठी जात आहेत.पर्यटकांचा तेथील हॉटेल आणि भोजनालय तसेच त्यांचा वाहतूक चालकांशी संबंध येत असते. हे संबंध अल्पकाळ असतात.पर्यटन विकास महामंडळाने शुद्धा पर्यटकांची वस्तू खरेदी करण्याची इच्छा लक्षात घेऊन पर्यटनस्थळी बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या.पर्यटन केंद्रात असलेल्या दुकानात मूर्ती, छायाचित्रे, अलंकार व विभिन्न प्रकारच्या कलाकृती असतात.या शिवाय त्या ठिकाणी फोटो स्टुडिओ व फोटोग्राफर असतो.त्यामुळे बाजारपेठमुळे आर्थिक विकासाठी चालना मिळत असते.पाश्चात्य लोक जे उच्चशिक्षित आहेत ते विविध ठिकाणांचे सृष्टी सौंदर्य पाहण्याच्या हेतूने देशातील व देशाबाहेरील पर्यटन स्थळांना भेटी देत असत.

परंतु आज पर्यटनामध्ये केवळ मौजमजा करणे व आनंद लुटणे या कल्पना मागे पडल्या.पर्यटनामध्ये सामाजिक पर्यटन ही संकल्पना आज उदयास येत आहे.सामाजिक पर्यटनामुळे अनेक नवनवीन केंद्रे उदयास येत आहेत.परंतु पर्यटन महागडया होत असल्याने पर्यटन स्थळाऐवजी अविकसित, दुर्लक्षित पर्यटन स्थळांची निवड करतात त्यामुळे दुर्लक्षित ग्रामीण भागातील रस्ते लहान घरगुती व्यवसाय उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण विकासात पर्यटन महत्वाचे स्थान आहे.

• ग्रमीण पर्यटन विकास : (Rural Development of Tourism)

ग्रामीण व शहरी पर्यटन हा आधुनिक काळातील एक महत्वाचा सेवा उद्योग बनल्यामुळे या उद्योगाकडे सरकारने जाणीवपुर्वक लक्ष दिले.सरकारला पर्यटनक्षेत्रात विकास करण्याशिवाय पर्याय राहिला नाही.भारत देशात वेगवेगळया राज्यात प्राचीन स्मारके, ऐतिहासिक वास्तू, मंदिरे, किल्ले, लेणी, गुहा,बुलंददरवाजे, मुर्तिशिल्प पाहाण्यास मिळते.भारतात या शिवाय लोकसंगीत, लोककला शास्त्रोक्त पद्धती, नृत्य, सणउत्सव रितीरिवाज, चालीरिती या दीर्घ परंपरा आहे.या देशात हजारो वर्षांची ऐतिहासिक स्थळे, धार्मिक स्थळे, नैसर्गिक स्थळे पर्यटकांची वाट पाहत

आहेत. यामुळेच या देशाला पर्यटकाचे नंदनवन संबोधले जाते.भारताच्या ग्रामीण व शहरी भागाच्या पर्यटन विकासासाठी भारताची प्राचीन परंपरा व सांस्कृतिक वारसा महत्वपूर्ण ठरतो. भारतात मोठमोठे डोंगर,पर्वतरांगा, उंचशिखरे, मैदानीपठारे, द—या,खो—या, बर्फाळप्रदेश, समुद्रकिणारा, जंगलामध्ये विविध जातीचे पशुपक्षी व प्राणी आढळतात.भारतात कला, साहित्य, संगीत, नृत्य व चित्रकलेचा विकास झालेला आहे.पूर्वीपासून पर्यटनाला भारतात महत्व असलेतरी ब्रिटिशांनी पर्यटन विकासाचा प्रयत्न केला.सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली १९४५ मध्ये एक समिती नियुक्त करण्यात आली.या समितीने आपला अहवाल १९४६ मध्ये सरकारला सादर केला.देशी—विदेशी पर्यटकांमध्ये विश्रामगृह, थंड हवेची ठिकाणे, नैसर्गिक विविध क्षेत्रे तसेच ऐतिहासिक व पुराणवस्तुविषयी आवड निर्माण करण्यासाठी उपाय सुचविणे. समितीच्या शिफारशीनुसार भारतात दिल्ली, कोलकत्ता व चेन्नई या बंडया शहरात प्रादेशिक पर्यटन कार्यालये स्थापन केली १९४९ मध्ये वाहतूक मंत्रालयात पर्यटन विकासासंबंधी एक वेगळी पर्यटन वाहतूक समिती स्थापन केली.पर्यटन वाहतूक विभाग, पर्यटन प्रशासन विभाग, पर्यटन जाहिरात विभाग, जाहिरात साहित्य वितरण विभाग, पर्यटन माहिती कार्यालय, स्वातंत्र्योत्तर काळातील पर्यटन विकास हा बेरोजगारांना—रोजगार उपलब्ध करून देणे.१९६७ मध्ये भारतीय पर्यटन व नागरी हवाई वाहतूक मंत्रालय स्थापन करण्यात आले. इ.स.१९६० मध्ये एक लाख २३ हजार ९५ परदेशी पर्यटक भारतात आले.तर इ.स.१९९५ मध्ये २१ लाख २३ हजार ६६३ परदेशी पर्यटक भारतात आले.पंचवार्षीक योजनात पर्यटन विकासासाठी अधिकाधिक प्रयत्न केले गेले.तिस—या पंचवार्षिक योजनेमध्ये केंद्र व राज्य सरकारकडे पर्यटनाविषयी कामे देण्यात आली.इ.स. १९७४ मध्ये पाचवी पंचवार्षिक योजनेत हॉटेलचा विस्तार करणे,पर्यटकांसाठी लॉज, मोटेल्स व पर्णकुटया तयार करणे, पर्यटकासाठी वाहतुकीची सोय करणे, पर्वतमय व मागास भागात पर्यटनाचा विकास करणे यावरही लक्ष केंद्रिय करण्यात आले.इ.स.१९८० मध्ये सहावी पंचवार्षिक योजनेत पर्यटकांच्या निवासाच्या क्षमतेचा उपयोग करणे व खाजगी आणि सार्वजनिक पर्यटकांच्या

निवासस्थानात भरपूर वाढ करणे हा या योजनेमागचा उद्देश होता.आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पर्यटन विकासासाठी अधिकाधिक प्रयत्न केले गेले.या योजनेत पर्यटन विकास करण्याचे कार्य खाजगी क्षेत्राकडे सोपविले गेले.याच काळात पर्यटनाचा विकास अधिकाधिक होण्यासाठी नऊ कलमी कार्यक्रम राबविण्यात आला.भारतीय पर्यटनाचा टप्याटप्याने विकास होत गेला.पर्यटन उद्योगाच्या संदर्भात चर्चा व शिफारस करण्यासाठी १९६३ मध्ये झा समिती नियुक्त करण्यात आली.या समितीने पर्यटनाचा विकास होण्याच्या दृष्टीने १९६५ मध्ये पर्यटन विभागात हॉटेल, भारतीय पर्यटन महामंडळ आणि भारतीय पर्यटन वाहतूक महामंडळ अशी स्वतंत्र मंडळे





नेमण्यात आली.बाहय देशातून अनेक पर्यटक भारतात येत असतात.त्यामुळे पर्यटकांच्या माध्यमातून परकीय चलन भारतात येत असे.ही संधी भारताला पर्यटनामुळे मिळत असते.

पर्यटनावर अवलंबून बरेच उद्योगधंदे चालत असतात.हॉटेल्स,विश्रामालये,वाहतूक, मार्गदर्शक, सरकारने स्थापन केलेली महामंडळ व कार्यालये ही बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देत असतात.या सर्व गोष्टीचे नियोजन करण्यासाठी व वेगवेगळया कामकाजांसाठी लोकांची गरज असते.त्यामधून अनेकांना रोजगार मिळतो.कामगार,मार्गदर्शक, वाहतूक कामगार, दुभाषे आणि स्वागतसुंदरी इत्यादी प्रकारच्या नोक—या गरजूंना उपलब्ध होत असतात.म्हणूनच रोजगार उपलब्ध करून देणे हा पर्यटन विकासाचा हेतू आहे.

• ग्रामीन पर्यटन विकासाचे हेतू :

भारतीय सरकारने पर्यटन हा बिगर भांडवलाचा व्यवसाय आसल्याने त्यांच्या विकासाकडे लक्ष दिले.म्हणूनच उद्योगाचे महत्व वाढले.या उद्योगामुळे भारत देशाला परकीय चलन मिळत असते.त्यामुळे पर्यटनस्थळी पैशांची मोठया प्रमाणात उलाढाल होत असते.पर्यटनावर अवलंबून बरेच उद्योगधंदे चालत असतात.कामगार,मार्गदर्शक, वाहतूक कामगार हे दुभाषे व स्वागतसुंदरी इत्यादी प्रकारच्या नोक—या गरजूंना उपलब्ध होत असतात.पर्यटन क्षेत्राचा विकास केला तर देशी आणि विदेशी पर्यटकांची संख्या वाढत जात असते. त्यामुळे भारत शासनाने भारतीय विकास महामंडळ स्थापन केले आणि या मार्फत भारतीय पर्यटन विकासास चालना मिळाली. त्यामुळे त्या संबंधित देशांचा इतिहास व संस्कृती समजावून घेण्यासाठी पर्यनाचा विकास करणे गरजेचे आहे.अशा माहितीमुळे पर्यावरण व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन होऊ शकते आणि त्या—त्या देशांतील पर्यावरण व संस्कृतीचे जतन करणे हे पर्यटन विकासातून त्या भागाचा विकास होण्यास मदत होते. पर्यटकांमुळे शेती विकासाला चालना मिळते.त्यामुळे पालेभाज्या, फळे व आल्हादायक अशी पिके घेणे आवश्यक बनली आहे. शेती व्यवसायाप्रमाणेच हस्तकला व्यवसाय विकासालासुद्धा चालना मिळून हस्तकलेतून तयार झालेल्या वस्तू, खरेदी केलेल्या असतात त्या खरेदी करून आपल्या घरी घेवून जातो.महाबळेश्वरला काठयांचा व्यवसाय, गोव्याला शंख—शिंपल्यांचा व्यवसाय, जम्मू.काश्मीरमध्ये गालिचे, पैठण येथे पैठणी साडया,औरंगाबाद, अजिंठा, वेरूळ येथे गौतम बुद्धाच्या विभिन्न प्रकारच्या मूर्ती व हस्तव्यवसायातून तयार झालेल्या वस्तू पर्यटक खरेदी करतो.त्यामुळे त्या भागातील लोकांच्या व्यवसायाला चालना मिळून उत्पादनात भर पडते.त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था सुधारते. शेती व्यवसाय, हस्तकला व्यवसाय, लघुउद्योग आणि उद्योगाला पर्यटनामुळे चालना मिळत असते.पर्यटनात विकास घडवून येतो.

• पर्यटनाचे हेतू : (Motives of Tourism)

पर्यटक करीत असल्यामुळे पर्यटकाला आनंद प्राप्ती, मौजमजा करणे, मनोरंजन, ऐशोआराम, धार्मिक आनंद, भौगोलिक माहितीचा आनंद, नैसर्गिक स्थळांतून आनंद, प्राप्त होतो. हा आनंद ईतर आनंदा पेक्षा वेगळा असतो म्हणून पर्यटनातून मिळणारा आनंद वेगळा आसतो. पर्यटनास प्रवृत्त करणारा महत्वाचा घटक हा ही शिक्षण आहे.शिक्षणासाठी प्राचीन परंपरा देश–विदेशात जाण्याची आहे.भारतात नालंदा, तक्षशिला, वाराणसी, प्रतिष्ठान,वल्लभी, विक्रमशिला ही शिक्षणाची महत्वाची केंद्रे होती.याच बरोबर अजिंठा, मथुरा, अयोध्या, नांदेड,वत्सगुल्म म्हणजेच वाशीम, नाशिक व काशी ही सुद्धा शिक्षणाची केंद्रे होती आज ही अनेक लोक शिक्षण,अभ्यास आणि संशोधनासाठी विविध पर्यटन स्थळांना भेट देत असतात. शैक्षणिक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून देशविदेशातून लोक भ्रमंती करून ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक आणि वैज्ञानिक स्थळांना भेटी देवून आपला संशोधन कार्यपूर्ण करतात.देशाची संस्कृतीत पर्यटकांच्या पर्यटनासाठी आकर्षित करीत असते.भारतीय प्राचीन संस्कृतीत बौद्ध संस्कृती महत्वाची असून साहित्य, कला, वास्तूकला, मुर्तिकला, स्तूप व स्थापत्याच्या क्षेत्रात भारतीय संस्कृतीला बौद्ध धर्माचे फार मोठी देणगी आहे.मौर्य सम्राट अशोकाने ८४००० बौद्ध स्तुपांची निर्मिती केली तर भारतात ९०० बोद्ध लेणी आहेत. फाहियान याने इ.स.३९९ ते इ.स.४१४, हयुएनत्संग याने इ.स.६२९ ते इ.स.६४५ व इत्सिंग याने इ.स.६७१ ते इ.स.६९५ या काळात भेटी देवून बौद्ध धर्म व संस्कृतीचा अभ्यास केला.पर्यटनाच्या मुख्य हेतू संस्कृती आणि सांस्कृतिक जीवनाचा आनंद समाजाच्या रूढीपरंपरा, चालीरीती, सण,उत्सव व वृत्तवैफल्ये ही वेगवेगळी असतात ते पाहावास मिळतात. जगात आज खिश्चन, इस्लाम, हिंदू, बौद्ध,जैन, पारशी, शीख इत्यादी धर्म आपापल्या धर्माचा विचार आणि तत्वज्ञानाने प्रभावित झालेली असतात. त्यामुळे त्या–त्या धर्माचे लोक त्या त्या पवित्र स्थळाची यात्रा म्हणजेच पर्यटन करीत असतात.धर्म आणि धार्मिक स्थळांना पर्यटनात फार महत्व प्राप्त झाले आहे.पर्यटनाच्या दृष्टीने स्वच्छ हवा आणि आरोग्यदायी हवामान महत्वाचे असते.महाबळेश्वर,माथेरान,म्हैसमाळ, चिखलदरा,उटकमंड,पंचमढी. ही थंड हवेची ठिकाणे असून ती आरोग्याच्या दृष्टीने महत्वाची आहेत.उलहौसी,,कुलु–मनाली,सिमला,कोडाईकॅनाल व उटी येथील आरोग्यधाम प्रसिद्ध आहेत. पर्यटकाचे राहणीमान, पर्यटकांचा पोशाख,पर्यटकांची भाषा,पर्यटकांची जीवनपद्धती आणि संस्कृती व त्याचे पर्यटन क्षेत्रातील स्थानिक व्यक्तीशी संबंध या सर्व गोष्टीचा प्रभाव पर्यटन क्षेत्रातील स्थानिक लोकांवर पडत असतो.त्यातूनच तेथील भागातील समाजाचा विकास होण्यास मदत होते.



• निष्कर्ष :

भारत देशाला प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा महान वारसा मिळालेला आहे. भारतीय संस्कृती व इतिहास जगात प्राचीन आहे. मौर्य, सातवाहन, गुप्त, वाकारक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालूक्य, चोल घराणे, पल्लव घराणे, चंदेल राजवंश, गंग राजवंश, देवगिरीचे यादव, सुलतानशाहीकाळ, मोगालकाळ, डच, पोतुर्गीज, फ्रेंच, ब्रिटिश, संगमघराणे, रजपूतान घराणे

या कालखंडात भारतात ऐतिहासिक, धार्मिक, लौकिक वास्तू व कलास्थापत्याची उभारणी करण्यात आली, त्यामुळे पर्यटक या भागाना भेटी देतात.

- प्राचीन वास्तू : लेणी, मंदिरे, बौद्ध विहार,स्तूप,दुर्गस्थापत्य, राजवाडे,घरे, उंच मीनार, बुलंददरवाजे, तटबंदी, व स्मारके
- प्राचीन कालात्मक वास्तु : मुर्तीशिल्प आणि मंदिर स्थापत्याचे कलात्मक अवशेष
- प्राचीन लेख : शिलालेख व ताम्रपट
- पुराण वस्तू : दगडी हत्यारी, धातूचे तुकडे, चित्रकलेचे अवशेष, भांडी,अवजोर, मणी,खापर, बांगडी, दागदागीणे इत्यादी.
- नाणी: अनेक सम्राटांच्या राजवटीतील सोने, चांदी, तांबे, ब्रॉझा, धातूची नाणी.
- उत्खननात मिळालेले अवशेषः भांडी,अवजारे, दैनंदिन वापरातील वस्तु. धान्याचे अवशेष.

जगातील काही देशात अर्थव्यवस्था या व्यवसायावर अवलंबून आहे.प्राचीन संस्कृती व इतिहास असलेल्या पौर्वात्य देशांना पर्यटनाचे दालन आता खुले झाले आहे.त्या निमित्ताने प्रत्येक देश आपापल्या पर्यटन साधनसामुग्रीचा विकास करीत आहे.रोजगार निर्मिती, अल्प भांडवल, प्रादेशिक विकास, आंतरराष्ट्रीय सामंजस्य,अन्य व्यवसायाच्या विकासास साहायय, सांस्कृतिक व ऐतिहासिक घटकांचे संवर्धन या दृष्टीने पर्यटनास पर्याय नाही.पर्यटनाचा राष्ट्रांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांवर परिणाम होणे केवळ अटळ आहे.सुयोग्य नियोजन,पर्यटन स्थळांचा विकास, नवीन पर्यटन स्थळांचा शोध, योग्य व परिणामकारक जाहिरात , पर्यटकांच्या मूलभूत सेवा सुविधांची उपलब्धता याद्वारे पर्यटनाचा विकास करता येतो.पर्यटन हा आर्थिक व्यवसाय असला तरी त्याचा संबंध देशाच्या सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक परिस्थितीशी निगडित आहे.यातूनच भौगोलिक, आर्थिक विकास पर्यटनातून घडवून येतो.

संदर्भ सूची ::


१. डॉ.विजया साखरे,ऐतिहासिक पर्यटन,अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर,२३जुलै२०१२.

२. डॉ.एस.बी.शिंदे, पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन,कोल्हापूर,ऑगस्ट २०००.

३. नरेश नदीम (संपादक) मानवजाति का इतिहास,प्रकाशन संस्थान, नवी दिल्ली,सन २०१४.

४. डॉ.अनिल कठारे, डॉ.विजया साखरे,प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती,विद्या बुक्स पब्लिशर्स,औरंगाबाद, जून २००८.

५. तुकाराम जाधव (संपादक) महाराष्ट्राच्या ऐतिहासिक—सांस्कृतिक, राजकीय,प्रशासकीय व आर्थिक जीवनाचा समग्र आढावा,द युनिक अँकॅडमी,पुणे२०१२.

६. डॉ.अनिल कठारे,डॉ.साखरे, डॉ.पाटील, पुरातत्व विद्या वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, मार्च २०११.

७. डॉ.जी.एस.महाडीक, प्राचीन महाराष्ट्रातील कला, आधार पब्लिकेशन,अमरावती, एप्रिल २०१२.

८. मधु मंगेश कर्णिक, सांस्कृतिक महाराष्ट्र—भाग १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०११.

९. डॉ.प्रभाकर गद्रे, भारतातील इतिहास प्रसिद्ध किल्ले, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर—२००२.

१०. मु.ग.सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे—३०.

११. अण्ण हजारे, राळेगणसिद्धी—एक कायाकल्प, राळेगणसिद्धी परिवार प्रकाशन, १५ ऑगस्ट १९९६.

१२. सुजीत कुमार, भारत का सामाजिक एवं सांस्कृतिक इतिहास, विश्वभारती पब्लिकेशन्स, नई दिल्ली.२०१४.






## ग्रामीण समाजाच्या परिवर्तनासाठी : महात्मा चक्रधरांचे योगदान

**प्रा. डॉ. संजय कसाब**
*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,*
*स्वा.सै.सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जंक्शन) जि. परभणी*

महाराष्ट्रात तेराव्या शतकात वैदिकांनी हैदोस घातला होता. ग्रामीण समाजातील बहुजनांचे मोठया प्रमाणात शोषण केले जात होते.वैदिक परंपरेत जातीयता, अस्पृश्यता मोठया प्रमाणात पाळली जात होती. ब्राह्मणी धर्मग्रंथांना आणि त्यांच्या परंपरेला जैन आणि लिंगायत धर्मांनी छेद देण्याचा या काळात प्रयत्न केलेला दिसून येतो. ब्राह्मणी झुंडशाहीला बहुजन समाज कंटाळला होता. ईश्वर आणि माणूस यांच्यामध्ये ब्राह्मणी व्यवस्था अडथळा ठरू पहात होती.यासर्व सामाजिक परिस्थितीमध्ये ग्रामीण समाज जीवनात परिवर्तन करण्यासाठी महानुभाव संप्रदायाचे योगदान महत्वाचे ठरले.

साधरणतः इस ११८५ ते १२८५ या दरम्यान महानुभावांच्या प्रगतीचा काळ समजला जातो. महानुभाव पंथाचे मुळ पुरूष गोविंद प्रभू गुंडम उर्फ गुंडोबा होत. ऋध्दिपूर येथे महानुभाव पंथाची उभारणी केली.''

ग्रामीण जीवन जगणाऱ्या बहुजन समाजाला संस्कृत भाषेच्या गुलामीतून मुक्त करुन महानुभव संप्रदायाने बाहेर काढले. विचाराचे अदान—प्रदान करणारी मराठी भाषा सार्वत्रिक केली. सामान्य माणसाला विचारांचे अदान—प्रदान करण्याचे महत्वाचे कार्य महानुभव संपद्रायाने मराठी भाषेतून केले.

सर्व ग्रामीण समाज जातीयता, कर्मकांडामुळे रसातळाला गेला होता.अशा परिस्थितीत गोविंदप्रभुंनी महानुभाव पंथाच्या माध्यमातून शोषक प्रवृत्तीला छेद दिला.'गोविंदप्रभू सर्व प्राणिमात्रात मिसळतात. लहान थोर किंवा समाजाच्या वर्णाचा, जातीचा ते भेद करीत नाहीत. आपल्या कृतीमधून माणसाने एक दुसऱ्याच्या उपयोगी पडावे, दीन—दुबळे व दु:खिताविषयी माणसाच्या ठिकाणी करूणा असावी, सर्व समाज हे सारखे असून माणसांमध्ये समानता असावी. धर्म रूढी शेवटी माणसांच्या केल्याणापुरत्याच लक्षात घ्याव्यात.'' असा परिवर्तनवादी विचार गोविंदप्रभूंनी महानुभाव संप्रदायाच्या माध्यमातून मांडल्याचे ग्रामीण साहित्याचे अभ्यासक व समीक्षक डॉ.वासुदेव मुलाटे सांगतात.

ग्रामीण समाज जीवनातील बहुजन समाज शंकराचार्यांच्या व धर्मकर्मकांडाच्या छळास बळी जात होता. मनुस्मृतीने ज्ञानबंदी केल्यामुळे तो अज्ञानात आपले जीवन गंठीत होता अशा काळात संवाद साधण्याचे मत्वाचे कार्य महानुभाव संप्रदायाने केले. यासाठी चक्रधर स्वामीचे महत्वाचे योगदान राहिले आहे. वर्णवादी धर्माने ब्राह्मणाचे वर्चस्व निर्माण केल्याने बहुजन